**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**
**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक/184/2024-25 **दिनांक** :-17/03/2025

# -: परिपत्रक :-

**विषय:- महाज्योती मार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा) व्यक्तिमत्त्व चाचणी/मुलाखत परीक्षेकरीता अर्थसहाय्य योजनेअंतर्गत पात्र व अर्जात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध करणेबाबत.**

महाज्योती, संस्थेद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोग (महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा) मुख्य परीक्षा-2023, उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व चाचणी/मुलाखत परीक्षेकरीता एकरकमी अर्थसहाय्य प्रदान करण्यासाठी सदर योजनेतंर्गत ऑनलाईन अर्ज दि.14/02/2025 ते दि.28/02/2025 रोजी पर्यंत मागविण्यात आले होते. त्यानुसार महाज्योतीच्या संकेतस्थळावर एकूण - 352 विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यामार्फत जाहिरात नं.122/2023 दि.27/01/2025 रोजी जाहिर केलेल्या निकालानुसार व महाज्योती कार्यालयाच्या अटी व शर्तीनुसार प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असून एकूण 307 विद्यार्थी सदर योजनेकरीता पात्र ठरलेले आहेत. त्याचप्रमाणे एकूण - 45 विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी असल्याने सदर विद्यार्थ्यांना अर्जात त्रुटी पुर्तता करण्याकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार पात्र व त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्वा
(विकास गडपायले)
प्रकल्प व्यवस्थापक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर